-११५-

**महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित ६६ के.व्ही ते ७६५ के.व्ही. पारेषण वाहिन्यांसाठी उभारण्यात आलेल्या / येणाऱ्या मनोऱ्यांच्या जागेचा मोबदला देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग,
शासन निर्णय क्रमांक:संकीर्ण ०२१०/प्र.क्र.२९/ऊर्जा-४
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : १ नोव्हेंबर,२०१०

वाचाः- व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित यांचे क्रमांकःमहापारेषण/सांका/प्रा.प्र./आरओडब्ल्यू/ १४३०, दिनांक २९/१/२०१०

**प्रस्तावना** :- महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित (महापारेषण) च्या कार्यक्षेत्रात ६६ के.व्ही. ते ७६५ के.व्ही. च्या पारेषण वाहिन्यांची उभारणी आणि अस्तित्वात असलेल्या वाहिन्यांची देखरेख, दुरुस्ती, नूतनीकरण ही कामे नेहमी होत असतात. बरेच वेळा पारेषण वाहिन्यांची उभारणी व अस्तित्वात असलेल्या वाहिन्याचे नूतनीकरण / दुरुस्तीची कामे करीत असताना निरनिराळ्या प्रकारचे अडथळे व जमीनधारकांकडून याबाबत विरोध होत असतो. महापारेषण कंपनीतर्फे विद्युत वाहिन्यांसाठी उभारण्यात येणाऱ्या मनोऱ्यामुळे व्यापलेल्या जमिनीचा क्षतीपूर्ती / मोबदला देण्याची बाब शासन स्तरावर विचाराधीन होती.

**शासन निर्णय** :- महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित यांच्याकडून महापारेषण कंपनीतर्फे विद्युत वाहिन्यांच्या उभारणीसाठी मनोऱ्यानी व्यापलेल्या जमिनीचा क्षतीपूर्ती /मोबदला (प्रस्तुतची व्यापलेली जमीन अधिग्रहित न करता ) जमीनीच्या खालील तपशीलात नमूद केलेल्या वर्गीकरणाच्याआधारे व संबंधित भागातील वार्षिक बाजार मुल्य दर तक्त्याप्रमाणे असलेल्या जमिनीच्या दरांच्या आधारे क्षतीपूर्ती / मोबदला मंजूर करण्यास शासन मंजूरी देत आहे.

1 3 DEC 2010

47926

रोटा/एच-२६३२[१०००-११-२०१०]-१

Raut- G.R.

[कृ.मा.प.

| जमिनीचा वर्ग | जमिनीचा प्रकार | जमिनीचा मोबदला |
|---|---|---|
| अ) | गैर सिंचनाखालील कृषि जमीन (कोरडवाहू) | २५ टक्के |
| ब) | सिंचनाखालील कृषि जमीन (ओलीत | ५० टक्के |
| क) | बागायती व फळबागांची कृषि जमीन (बागायती जमीन) | ६० टक्के |
| ड) | गैर कृषि जमीन (शहरी जमीन) | ६५ टक्के |

२. वरीलपैकी वर्ग-अ आणि वर्ग-ब मधील जमिनीचा मोबदला ठरविण्याचे अधिकार संबंधित विभागीय उपजिल्हाधिकारी यांना तसेच वर्ग-"क" व "ड" मधील जमिनी संबंधी मोबदला ठरविण्याचे अधिकार संबंधित जिल्हाधिकारी यांना प्रदान करण्यात येत आहेत. सदरचे मुल्यांकन मंजूरीची प्रकरणे त्यांनी त्यांच्या अध्यक्षीय समितीमार्फत ३० दिवसात निकाली काढण्यात यावेत.

३. सदर निर्णय खाजगी कंपनी तसेच पॉवर ग्रीड कॉर्पोरेशन यांना त्यांचे मनोरे उभारण्यासाठी व्यापलेल्या जमिनीच्या प्रकरणीही लागू राहील.

४. हा शासन निर्णय महसूल व वन विभागाच्या सहमतीने त्या विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्रमांक : संकीर्ण ६/२०१०/९०/ज-१, दिनांक १८/६/२०१० अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर आदेश निर्गमित केल्याच्या दिनांकापासून अंमलात येतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( सी.के.जाधव )
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रती,
अप्पर मुख्य सचिव (महसूल व वने),मंत्रालय,मुंबई.
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी मर्यादित
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी
मा.मंत्री (ऊर्जा) यांचे विशेष कार्य अधिकारी
मा.मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव
मा.राज्यमंत्री (ऊर्जा) यांचे स्वीय सहाय्यक
सर्व मंत्रालयीन विभाग
पॉवर ग्रीड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (पत्राद्वारे)
महसूल व वन विभाग (कार्यासन ज-१), मंत्रालय,मुंबई.
ऊर्जा विभागातील सर्व कार्यासने
निवड नस्ती- ऊर्जा-४

Raut- G.R.
एच-२६३१ -१३।•